# दरपत्रके सादर करणे बाबत

जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/लोखंडी फ्लॅक्स बोर्ड/ 7495 /२०१८ अमरावती शहर दिनांक ०६ JUL २०१८

**विषय :-** पोलीस आयुक्तालयाचे वतीने लोखंडी फ्लॅक्स बोर्ड, तयार करून आयुक्तालयातील सर्व पो.स्टे. तसेच इतर ठिकाणी लावायचे असल्याने दरपत्रके सादर करणे बाबत.

-००००-

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पोलीस आयुक्तालयाचे वतीने जनतेमध्ये जनजागृती, तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५ च्या अंमलबजावणी करीता तसेच **"आपले सरकार"** या पोर्टलवर जनतेच्या उपयोगाकरीता १४ सेवा ऑनलाईन स्वरूपामध्ये उपलब्ध करून दिल्याने सदर सेवेची अंमलबजावणी व प्रसिध्दी करीता **४x६ फुट** आकाराचे १५ नग लोखंडी फ्लॅक्स बोर्ड तयार करावयाचे आहेत. तसेच याव्यतिरिक्त **६x८ साईजचे** चे सुध्दा लोखंडी फ्लॅक्स बोर्डाचे दर मागविण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे लोखंडी फ्लॅक्स बोर्ड तयार करावयाचे असल्याने अधिकृत विक्रेता/पुरवठादार/वितरक यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छूक अधिकृत विक्रेते/पुरवठादारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंध दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत **दिनांक १२/०७/२०१८ ला १०.००** वाजेपर्यंत पर्यंत (शासकीय सुटी वगळून) या कार्यालयातील प्रबंधक शाखेत सादर करावीत. पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे अनिवार्य आहे. तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे सुध्दा अनिवार्य आहे.

१. पुरवठादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र
२. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
३. पॅन कार्डची छायांकीत प्रत

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्रा-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल. याची कृपया पुरवठादार/वितररक यांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. सदरचे पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक निविदाधारकांनी सुध्दा दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

(पोलीस आयुक्त,यांचे मान्यतेने)

(म. ही. बैस)
कार्यालय अधीक्षक
पोलीस आयुक्त कार्यालय
अमरावती शहर

**प्रति,**

१) मे. न्यु वरद ग्राफीक्स, अमरावती
२) मे. ज्ञानश्वरी ग्राफीक्स, अमरावती
३) मे. अलिशा फ्लॅक्स , अमरावती.

**प्रत,** सपोनि , सायबर सेल,

२/- उपरोक्त.पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावे.



Scanned by CamScanner